


गणेश उत्सव निमित्त सर्व वाचक वर्गाला हार्दिक शुभेच्छा

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 27/08/२०२5 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 192 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# मंत्रिमंडळ बैठकीत नऊ मोठे निर्णय

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. (२६ ऑगस्ट) राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत नऊ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.या बैठकीत जलसंपदा, कामगार, सहकार, विधी व न्याय, सार्वजनिक बांधकाम, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागांतर्गत मोठे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांचा प्रामुख्याने पुण्यासह नागपूर, अमरावती आणि बीड जिल्ह्याला फायदा होणार आहे.

मंत्रिमंडळ बैठक पार पडल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाजमाध्यमांद्वारे या निर्णयांची माहिती दिली आहे.

१. मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकारने घेतलेले महत्वपूर्ण निर्णय -

जलसंपदा विभाग – बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव, ब्रम्हनाथ येळंब (ता. शिरुर (का) टाकळगाव (हिंगणी) (ता. गेवराई) या तीन कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचा विस्तार व बॅरेजमध्ये रुपांतरण करण्याच्या कामास मान्यता.

कामगार विभाग – राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यास मान्यता.

सहकार विभाग – पुणे जिल्ह्यातील राजगड सहकारी साखर कारखाना लि. अनंतनगर निगडे, (ता. भोर) या साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून खेळत्या भांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या मार्जिन मनी कर्जास मंजुरी तसेच संघर्षयोद्धा बबनराव ढाकणे केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लि. सुमननगर, ता शेवगाव, अहिल्यानगर या साखर कारखान्यास महाराष्ट्र राज्य सहकारी बँककडून शासन हमीवर मुदती कर्ज उपलब्ध करून देण्यास मान्यता.

सहकार विभाग – पुणे जिल्ह्यातील यशवंत सहकारी साखर कारखाना लि. चिंतामणीनगर, मु. पो. थेऊर (ता. हवेली) या कारखान्याच्या जमीन विक्रीस मान्यता.

सार्वजनिक बांधकाम विभाग – नागपूर गोंदिया प्रवेश द्रुतगती महामार्ग प्रकल्पास मान्यता, प्रकल्प महामंडळामार्फत हाती घेण्यास, प्रकल्पाच्या आखणीस व भूसंपादनास मान्यता.

विधी व न्याय विभाग – बीड जिल्ह्यात आष्टी येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय स्थापन होणार. त्याअनुषंगाने न्यायिक अधिकारी व कर्मचारीवृंदांची पदे निर्मिती व या न्यायालयासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता.

विधी व न्याय विभाग – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग – विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याची कार्यपद्धती प्रभावीरित्या राबवणार.महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग – नागपूर व अमरावती विभागातील निवासी वापरासाठी लिलावाद्वारे-प्रिमियम अथवा अन्य प्रकारे भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनीबाबत विशेष योजनेला आणखी एक वर्षाकरिता मुदतवाढ.

# अतिवृष्टीमुळे जम्मूतील दोडा जिल्ह्यात हाहाकार

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



जम्मू आणि काश्मीरच्या दोडा जिल्ह्यात मुसळधार पाऊस, ढगफुटी आणि भूस्कलनामुळे किमान चार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. दोडाचे उपायुक्त हरविंदर सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, घर कोसळून दोघांचा तर तर पूरामुळे दोन जणांचा मृत्यू झाला आहे. या भागातील अनेक घरे आणि रस्ते उध्वस्त झाले आहेत. प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ झाल्यामुळे अधिकाऱ्यांनी नदीकाठच्या रहिवाशांना तिथून दूर जाण्याचे आवाहन केले आहे.मुसळधार पावसामुळे रस्त्याचा मोठा भाग वाहून गेल्याने दोडा आणि किश्तवारला जोडणारा महत्त्वाचा दुवा असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र. २४४ वरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. विविध ठिकाणी भूस्खलन झाल्यानंतर जम्मू-पूंछ महामार्गावरून वाहनांची वाहतूक रोखण्यात आली आहे.दोडाचे उपायुक्त हरविंदर सिंग यांनी पुढे सांगितले की, दोडा-भादेरवाह, थाथरी-तांता आणि धारा-जई दरम्यानचे रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. मुसळधार पावसामुळे सतरा घरे आणि काही सरकारी मालमत्तेचेही नुकसान झाले आहे.जम्मू शहरातील तावी नदी २७ फूट वेगाने वाहत असून धोक्याच्या पातळीपेक्षा १० फूट अधिक असल्याची माहिती देण्यात येत आहे.

अखनूर येथे चिनाब नदी ३५.६ फूट वेगाने वाहत असून ती धोक्याच्या पातळीहून अर्धाफूट अधिक असल्याची माहिती मिळत आहे.एसडीआरएफ, पोलीस आणि नागरी संस्था बचाव कार्यात सहभागी झालेल्या आगेत. त्यांनी तावी आणि चिनाब नदीच्या काठावरील सखल भागातील लोकांना बाहेर पडण्यास सांगितले आहे. तसेच मानवतावादी भूमिका म्हणून भारताने पाकिस्तानला रविवारी पूराची पूर्वकल्पना दिली

# मनपा आयुक्त शेखर सिंह यांनी केली विसर्जन घाटांची पाहणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंगळवारी सकाळी मोशी खाणसह शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांची पाहणी केली. विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी विसर्जन घाटांवर आवश्यक सोयीसुविधांसह पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात यावी, असे निर्देशही आयुक्त सिंह यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या पाहणी दौऱ्यावेळी महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उपायुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उद्यान अधिक्षक योगेश वाळुंज, कार्यकारी अभियंता हरविंदसिंह बन्सल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.आयुक्त शेखर सिंह यांच्या पाहणी दौऱ्याला मोशी खाण येथून सुरुवात झाली. यावेळी आयुक्त सिंह म्हणाले, 'मोशी खाणीकडे येणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून त्याची डागडूजी करावी. याठिकाणी महापालिकेच्या आठही प्रभागांतून येणाऱ्या गणेश उत्सव मूर्तींच्या विसर्जनासाठी पुरेसे कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत. आरोग्य विभाग व सुरक्षा रक्षकांची पथके येथे कार्यरत ठेवावीत. आवश्यक तेथे सीसीटीव्हीसह लाईट, मंडप, पिण्याचे पाणी आदी व्यवस्था करण्यात यावी,' असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.

मोशी खाणीनंतर आयुक्त सिंह यांनी मोशी येथील इंद्रायणी नदी विसर्जन घाट,पिंपरी येथील पवना नदीवरील झुलेलाल घाट, सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाट अशा प्रमुख घाटांची पाहणी केली.

यावेळी आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'विसर्जन घाटांवर गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा. विसर्जन घाटांवर पुरेसे कर्मचारी व यंत्रणा कार्यान्वित ठेवा. निर्माल्यकुंडाची व्यवस्था करा. कृत्रिम विसर्जन हौदांच्या स्वच्छतेला प्राधान्य द्या. घाटांवर सुशोभीकरण करा. दिशादर्शक फलक लावा. जीवनरक्षक, अग्निशमन विभागाचे जवान व आपदा मित्र यांची नियुक्ती करा. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवा. आवश्यक तेथे सीसीटीव्ही लावा. विसर्जन घाटाकडे येणाऱ्या रस्त्यांची डागडूजी करा,' असे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी संबंधित विभागप्रमुख, क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

आयुक्त शेखर सिंह यांनी गणेश विसर्जन घाटांवर विसर्जन केल्या जाणाऱ्या उत्सव मूर्तींची नोंद ठेवण्याचे निर्देशही संबंधित विभागांना दिले आहेत. विसर्जनासाठी आलेल्या मूर्तींची नोंद ठेवताना ती पीओपीची आहे की शाडू मातीची आहे, मूर्तींची उंची पाच फूट किंवा त्यापेक्षा जास्त आहे का, याप्रमाणे तिची नोंद करून ठेवावी, असे आयुक्त सिंह म्हणाले.

# प्रारूप प्रभाग रचनेवर तीन दिवसांत दोन हरकती प्राप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : महापालिकेच्या वतीने शुक्रवारी (दि. २२) प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. या रचनेविरुद्ध नागरिकांना ४ सप्टेंबरपर्यंत हरकती देण्याची संधी देण्यात आली आहे. मात्र, प्रारूप रचना जाहीर झाल्यापासून तीन दिवसांत आतापर्यंत केवळ दोन हरकती प्राप्त झाल्या आहेत.

प्राप्त हरकती प्रभाग ८ आणि प्रभाग २१ मधून आल्या आहेत. प्रभाग ८ मध्ये इंद्रायणी नगरला संतनगर नाव जोडण्याची मागणी करण्यात आली आहे, तर प्रभाग २१ मध्ये अनुसूचित जाती, जमाती तसेच आदिवासी मतदारांची संख्या असल्यामुळे त्या प्रभागाला मागासवर्गीय प्रभाग म्हणून घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे.महापालिकेची ही प्रारूप प्रभाग रचना अंतिम टप्पा नसून लोकांचा अभिप्राय घेऊन अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. प्रशासनाने महापालिकेच्या संकेतस्थळावर संपूर्ण शहराचा नकाशा प्रसिद्ध केला. सामाजिक कार्यकर्ते, नागरिक, इच्छुक नकाशे पाहण्यासाठी येत आहेत. नकाशांचे मोबाइलवर छायाचित्रे घेण्यात येत आहेत. पालिकेच्या संकेतस्थळावर सर्व ३२ प्रभागांचे नकाशे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. संकेतस्थळावर मुख्यपृष्ठ समोर आल्यानंतर नवीन प्रारूप प्रभाग रचना असे शीर्षक झळकत आहे.

दरम्यान इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरवात केली आहे. सोशल मिडीयावरून मेसेज पाठविले आहेत.

तसेच गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी सर्वच प्रभागामध्ये इच्छुकांनी विविध उपक्रम सुरू केले आहेत.

# डेंग्यू-मलेरिया निर्मूलनासाठी महापालिकेकडून व्यापक उपाययोजना

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पावसाळ्यामुळे सर्वत्र पाणी साचणे व ओलसरपणाचे प्रमाण वाढले असून डेंग्यू व मलेरियासारख्या आजारांचा धोका गंभीर बनला आहे.

या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने डास निर्मूलन मोहिमेला गती दिली आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे आणि उप आयुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे.पावसामुळे घरांच्या अंगणात, छपरांवर, बांधकाम स्थळांवर, भंगाराच्या ठिकाणी तसेच विविध कंटेनरमध्ये पाणी साचून डासांची उत्पत्ती होत असल्याचे आढळून आले आहे. हे थांबवण्यासाठी औषध फवारणी, घरांची व कंटेनर तपासणी, भंगार दुकाने व बांधकाम स्थळांची पाहणी, तसेच जनजागृती आणि दंडात्मक कारवाईवर विशेष भर देण्यात आला आहे.

**पालिकेची कारवाई -**

१. घरांची तपासणी: ८१ लाख ३२ हजार ८९ घरांची तपासणी; त्यापैकी १२ हजार ८१४ घरांमध्ये डास वाढीस पोषक स्थिती.

२.कंटेनर तपासणी: ४३ लाख ३२ हजार ५३० कंटेनरपैकी १३ हजार ८६४ कंटेनरमध्ये डासांची उत्पत्ती.

३.भंगार दुकाने: १७०३ दुकानांची तपासणी.

४. बांधकाम स्थळे: १९९९ स्थळांवर पाणी साचल्याचे निदर्शनास.

५. नोटीस व दंड: ३ हजार ९५३ नोटिसा, ९८८ नागरिक/आस्थापनांवर दंडात्मक कारवाई; ३५ लाख ८१ हजार रुपये दंड वसूल.

**पावसाळी प्रतिबंधात्मक उपक्रम**

१.नियमित औषध फवारणी

२.घरोघरी माहितीपत्रके वितरण

३. शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी जनजागृती प्रशिक्षण

४. प्रभागस्तरावर विशेष जनजागृती कार्यक्रम

५.सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिमा

# पोलिसावर हल्ला करणाऱ्या तरुणाला अटक

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




एका तरुणाने पोलीस कर्मचाऱ्याला हत्याराचा धाक दाखवून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. आरोपीने पोलिसाच्या डाव्या हाताला चावा घेऊन त्याला दुखापत केली आहे.

ही घटना खेड तालुक्यातील खराबवाडी येथील नवमहाराष्ट्र विद्यालयाजवळ शनिवारी (दि. २३) रात्री घडली.दिपक अशोक जंगले (वय १९, रा. खराबवाडी) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी मरकड यांनी रविवारी (दि. २४) महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी आपत्कालीन मदत करण्याचे सरकारी काम करत असताना आरोपीने त्याच्या हातात सत्तूर घेऊन 'तुम्ही इथे कशाला आला आहात' असे म्हणून त्यांना धमकावले. सरकारी कामात अडथळा निर्माण करून सत्तूरसह फिर्यादीच्या अंगावर धावून येत 'आता तुम्हाला जिवंत सोडत नाही' असे बोलून जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याने पोलिसावर वार केला. मरकड यांनी वार चुकवून आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने झटापट करून त्यांच्या डाव्या हाताला चावा घेतला आणि दुखापत केली.

# तळेगाव येथील तलावात सापडला बेपत्ता तरुणीचा मृतदेह

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




शहरातील रेल्वे स्टेशनलगतच्या तलावात हरविलेल्या तरुणीचा मृतदेह सापडला असून या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. साक्षी कांतीकुमार भावर (वय २२, रा. भीमाशंकर कॉलनी, वराळे मावळ, मूळगाव बऊर) असे तरुणीचे नाव आहे. ती घरी परतली नसल्याने आणि संपर्क होत नसल्याने तिच्या नातेवाइकांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती.पोलीस निरीक्षक प्रविण कांबळे व उपनिरीक्षक भरत वारे यांनी मोबाइल लोकेशनच्या आधारे शोध सुरू केला असता साक्षीचे लोकेशन तलाव परिसरात असल्याचे समोर आले. तलावाच्या काठावर तिची बॅग व मोबाईल मिळाला. पाण्यावर तरंगणारे बूट दिसल्याने पोलिसांना संशय निर्माण आला. वन्यजीव रक्षक मावळ संस्थेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने शोधमोहीम राबवून मृतदेह बाहेर काढला. तिला तत्काळ सीपीआर देऊन वाचविण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र डॉक्टरांनी तपासल्यानंतर तिला मृत घोषित केले. या कारवाईत निलेश गराडे, शुभम काकडे, गणेश गायकवाड, राजेंद्र बंडगे, राजू सय्यद व अनिश गराडे यांनी सहकार्य केले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ‘आयआयएम’ उभारणीचा “श्रीगणेशा”

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड - उद्योग नगरी, कामगार नगरी, आयटी हब आणि ऑटो हब अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात आता देशातील नामांकित भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM-नागपूर) ची शाखा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.सर्वत्र गणेश आगमनाचा उत्साह सुरू असतानाच शहरात आता आयआयएम सारखी नामांकीत संस्था सुरू करण्याचा “श्रीगणेशा” झाला आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकल्पाला हिरवा कंदील देत ७० एकर जागा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांचा हा “ड्रीम प्रोजेक्ट” आता दृष्टीक्षेपात आला आहे.शहरातील मोशी येथील गट क्रमांक ३२५ मधील शासकीय गायरान जमिनीवर आयआयएमची शाखा उभारली जाणार आहे. यामुळे पिंपरी-चिंचवडच्या लौकीकात आणखी भर पडणार असून, औद्योगिक विकासाला नवी गती मिळणार आहे. याआधी त्यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची शाखा सुरू करण्यासाठी आमदार लांडगे पुढाकार घेतला होता आणि त्याला यश मिळाले. आता आयआयएम-नागपूरची शाखा सुरू करण्याचे स्वप्न साकार होत आहे.औद्योगिक नगरीत आयआयएमची शाखा सुरू झाल्यास रोजगार, संशोधन आणि उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होतील.

देशभरातील विद्यार्थी पिंपरी-चिंचवडमध्ये येतील, उद्योगजगताशी थेट संपर्क साधला जाईल आणि शहराची शैक्षणिक ताकद अधिक बळकट होईल, असा विश्वास आमदार लांडगे यांनीव्यक्तकेलाआहे.

प्रतिक्रिया :“पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक शहर असून येथे देशाच्या कानाकोपऱ्यातील नागरिक वास्तव्यास आहेत. मुंबई-पुणे कनेक्टिव्हीटी, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक वातावरण लक्षात घेता आयआयएमसारखी संस्था सुरू होणे हे शहरासाठी अभिमानास्पद आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेतली होती. आता महसूल मंत्री यांनी जागेला मान्यता दिली आहे. I I M चे संचालक डॉ. भीमराय मेत्री यांनी पुढाकार घेतला आहे. आता 'आयआयएम' च्या कामाला आता गती मिळेल.- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पी एम पी एल संस्थेस विविध पासेसची रक्कम अदा करणे, ड गटातील वाहनांच्या दुरुस्ती कामी निविदा कालावधीत मुदतवाढ देणे, प्रभाग क्रमांक ८ मधील विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे या कामाच्या सुधारित अंदाजपत्रकात मान्यता देणे कामी महानगरपालिकेच्या सभेकडे शिफारस करणे, अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील पाणीपुरवठा दुरुस्ती व नवीन जलवाहिन्या टाकण्याकरिता खोदण्यात आलेल्या चेंबरचे डांबरीकरण करणे, पिंपरी चिंचवड मनपा शास्त्रातील दत्तनगर दिघी येथील मंडपाचे सभामंडप बांधणे, ह क्षेत्रीय कार्यालय परिसरातील स्वच्छतागृह देखभाल दुरुस्ती व साफसफाईच्या कामाकरिता लहान जेटिंग मशीन खरेदी करणे, ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरणासाठी चार रिक्षा टेम्पो वाहन इंधन व वाहन चालकास प्रतिदिन भाड्याने घेण्याच्या निविदेस मुदतवाढ देणे, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे बाबत पीओपी गणेश मूर्तींचे शास्त्रोक्त विघटन करणेकामी पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत अमोनियम बायकार्बोनेट या रसायनाची शासकीय दराने खरेदी करणे, महाराष्ट्र शासन नगरपरिषद प्रशासन संचालनायमार्फत उपलब्ध होणारी रिसायकल वाहने

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत करणे व सन २०-२५ चे अंदाजपत्रकामध्ये वाढ घट करून तरतूद करणे, फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध उद्यान देखभाल करणे, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अवकारिका चित्रपट दाखविण्यासाठी आलेल्या खर्चास मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579